# कै. आप्पांच्या आठवणी, विचार आणि कार्य



१४/०९/२०१५

---

**बाबांचं अखेरचं दर्शन**

१९५८ पासून आप्पा दैनंदिन संघकार्यातून मुक्त झाले. १९६२ मध्ये ज्ञान प्रबोधिनीची स्थापना झाली. हा सर्व काल चिंतनाचा होता. हे चिंतन काही नवनिर्माणासाठी होतं. संघात काय काय होतं? अनुशासनबद्ध अखिल भारतीय संघटना, हिंदुराष्ट्रविचाराची दृढ बैठक आणि हिंदू समाज संघटीत नि बलशाली करण्याची प्रेरणा.

आप्पांना याशिवाय अधिक काय करायचं होतं? ज्ञान प्रबोधिनीच्या घटनेत १९६३ मध्ये त्यांनी लिहून ठेवलं आहे –

**भारतीय राष्ट्राचं प्रबोधन करायचं आहे !**

३.१ ज्ञान प्रबोधिनी म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकांचे शिक्षण देणारी सामान्य प्रतीची शिक्षणसंस्था नव्हे. म्हणून प्रबोधिनीत विद्यार्थी शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आत्मिक अशा सर्व प्रकारच्या शक्तींनी संपन्न होईल अशा प्रकारचे शिक्षण देणे.

३.२ भारताच्या आर्थिक, औद्योगिक, शेतकी, शैक्षणिक, वैज्ञानिक, शासकीय, तांत्रिक, सैनिकी इत्यादी प्रांगणांत श्रेष्ठ चारित्र्याचे आणि कणखर राष्ट्रीय वृत्तीचे नेते पुरेशा प्रमाणात आज उपलब्ध नाहीत. अशा नेत्यांची आवश्यकता ही केवळ प्रचलित कालापुरतीच नसून ती नित्याचीच निकड आहे. म्हणून सर्वकष नेतृत्वाची धुरा आपापल्या क्षेत्रात स्वीकारतील आणि राष्ट्राच्या हाकेला ओ देतील असे कार्यकर्ते निर्माण करणे.

३.३ हे अभिप्रेत नेतृत्व उपलब्ध होण्याचे उगमस्थान म्हणजे या राष्ट्रातील कुशाग्र बुद्धीचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी हे होय. अशी ही उगवती पिढी राष्ट्राची अमोल संपत्ती आहे. या पिढीच्या निसर्गप्राप्त कुशाग्र बुद्धिमत्तेला आवश्यक त्या अन्य गुणांची आणि साधनांची जोड मिळू शकल्यास वर अभिप्रेत असलेले सर्वकष

नेतृत्व द्रुतगतीने विकसित होऊ शकेल. म्हणून तसे गुण संपादन करण्याची संधी आणि सोय नवोदित पिढीला उपलब्ध करून देणे.

३.४ व्यक्तिविकसनाच्या कल्पना अधिक स्पष्ट करणे उपयुक्त आहे. व्यक्तिविकसन करणे म्हणजे प्रखर बुद्धिमत्तेच्या या विद्यार्थी-विद्यार्थिनीमध्ये विशेष गुणसंपदा निर्माण करणे. या गुणसंपदेमध्ये सदाचार, सत्प्रवृत्ती, अभ्यासशीलता, उद्योगप्रियता, राष्ट्रीय प्रेरणा, उज्ज्वल भारतीय संस्कृतीचा व परंपरेचा अभिमान, स्वावलंबन, उत्स्फूर्तिसंपन्नता (इनिशिएटिव्ह), अंत:प्रेरणा (इण्टयूइशन), संघटन चातुर्य इत्यादी चारित्र्यगुणांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. हे गुण विकसित होऊन स्वत:वरील राष्ट्रीय ऋणाची जाणीव त्यांच्या मनात सदैव स्फुरेल असे करणे.

३.५ प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित अशी गुणसंपदा निर्माण होण्यासाठी, म्हणजेच व्यक्तिविकसनासाठी, सुयोग्य अशी शिक्षणपद्धती शोधणे आणि व्यवहारात आणणे. हे साधण्यासाठी जगातील प्रगत देशांच्या शैक्षणिक कल्पना व प्रणाली यांचा अद्ययावत् तौलनिक अभ्यास करणे, त्या अभ्यासातून भारताच्या दृष्टीने योग्य ती शैक्षणिक तत्त्वे स्वीकारणे आणि योगशील राहून आपल्या प्रतिभेतून आपली प्रणाली निर्माण करणे व ती निर्दोष करणे.

३.६ प्रबोधिनीतील विद्याव्रताचे नाते हे अल्पकालीन असणार नाही. शक्य झाल्यास हे नाते आयुष्यभराचे असावे अशी अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांच्या केवळ शालेय शिक्षणाच्या कालावधीतच नव्हे तर त्यांच्या महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणकालात आणि तदनंतरदेखील प्रबोधिनी हा त्यांच्या राष्ट्रीय स्फूर्तीचा झरा ठरावा आणि त्यातून राष्ट्रघडणीची वाटचाल करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांच्या मनात उत्पन्न व्हावी अशी अपेक्षा आहे. ती अपेक्षा पूर्ण होण्यासाठी आवश्यक अशा कल्पना आणि तंत्रे उदित करणे.

३.७ नेतृत्वविकसन, शिक्षणप्रणालीची निर्मिती इत्यादी वर ग्रथित केलेल्या उद्देशांच्या मुळाशी स्वदेशात विचार प्रबोधन व कार्य प्रबोधन व्हावे, देशाचा कायापालट व्हावा, येथे पुनरुज्जीवन होऊन देशात आणि लोकमानसात नवचैतन्य निर्माण व्हावे असा हेतू आहे. तो साध्य होईल अशा तऱ्हेचे कार्य घडवणे.